**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR. 416 004**
Phone No. 2690571, 2693643, 2693730
Controller of Exam. Office Ph.2693176, Fax No-231-2690655
B.Sc./M.Sc.Exam. Section Phone No. 0231-2609118

A+
Accredited by NACC
2014

---

**जा.क्र. एस.यु/परीक्षा/बी.एस्सी./७६६१** **दिनांकः ०२/०३/२०१५**

प्रति,

मा. संचालक/प्राचार्य
सर्व संलग्नित विज्ञान महाविद्यालये

**विषयः बी.एस्सी (सर्व शाखा) व बी.सी.एस प्रथम वर्ष प्रात्यक्षिक परीक्षेबाबत**
**संदर्भः- परीक्षांचे विकेंद्रीकरण करण्याबाबतचा आगरवाल समितीचा शासनाने मान्य केलेल्या शिफारसी**

महोदय,

एप्रिल/मे २०१४ च्या बी.एस्सी (सर्व शाखा) व बी.सी.एस प्रथम वर्ष (सेमी पॅटर्न) थेअरी परीक्षा महाविद्यालयाने घेवून त्यांचे निकाल डी.यु.डी.सी या प्रोज्येक्ट मधून जाहीर झालेले आहेत.

आगरवाल समितीच्या शिफारसीनुसार बी.एस्सी (सर्व शाखा) व बी.सी.एस प्रथम वर्ष प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयांनी घ्यावयाच्या आहेत त्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे.

१) लेखी परीक्षांचे वेळापत्रक विचारात घेवून तत्पूर्वी प्रात्यक्षिक परीक्षेकरीता विषयानुसार विद्यार्थ्यांच्या अडचणी तपासून त्यांचे बॅचेस तयार करुन वेळापत्रक जाहीर करुन सूचना फलकावर लावावे. सदरची प्रात्यक्षिक परीक्षा दिंनाक ०१ मार्च २०१५ ते १५ मार्च २०१५ या कालावधीत पूर्ण करुन या विभागास अहवाल सादर करावा.

२) नियमानुसार मानधन व अनुषंगिक भत्ते महाविद्यालयाकडे ठेवण्यात आलेल्या ७५ रक्कमेतून आदा करावयाचे आहे. परीक्षेचे मानधन हे विद्यापीठाच्या नियमानुसार देण्यात यावे. यासाठी पत्र क्रं शि.वि./परीक्षक नि./एजेई २९२०/दिं.०३/१०/२०१२ पहावे.

३) संबंधीत विज्ञान महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयामध्ये ज्या ज्या विषयांची टिंचींग प्रोव्हीजन आहे त्या सर्व विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी संबधीत विषय शिक्षकांनी प्रश्नपत्रिका संच तयार करुन किंवा अन्य पर्याय निवडून प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण कराव्यात. व त्याचे मानधन संबंधीत महाविद्यालयाने ७५ रक्कमेतून आदा करावयाचे आहे.

४) बैठक क्रं प्राप्त झाल्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षेंचे गुण डी.यु.डी.सी प्रोज्येक्ट या संगणकीय प्रणलीमध्ये महाविद्यालयामधूनच फिड करावेत व त्याची प्रिटेंड प्रत आपल्या रेकॉर्डमध्ये सुव्यवस्थीत ठेवावी.

५) प्रात्यक्षिक परीक्षेकरीता संबंधीत महाविद्यालयास विद्यार्थ्याचा ***बैठक क्रं प्राप्त न झाल्यास*** त्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ही त्यांचा रोल नंबर, सोळा अंकी पी.आर.नं तसेच विद्यार्थ्यांच्या नांवाची नोंद करुन घ्यावी. व त्याची माहिती स्वतंत्ररित्या परीक्षा विभागास देवून त्याची एक प्रत महाविद्यालयात जतन करावी.

कळावे,

आपला विश्वासू

मा. परीक्षा नियंत्रक

प्रतः १) परीक्षक नियुक्ती विभागास माहितीसाठी
२) डी.यु.डी.सी विभागास माहितीसाठी